दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र

बीड महाराष्ट्र | रविवार, 28 जून 2026 | अंक क्र. 54 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

# महाराष्ट्रातील २७ जिल्ह्यांना यलो अलर्ट; लवकरच पावसाच्या सरी बरसणार

■ मुंबई : वृत्तसंस्था

वाढत्या उष्णते मध्ये दिलासादायक गोष्ट समोर आली आहे. 28 जून रोजीही राज्यातील 27 जिल्ह्यांना पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. काही भागांत विजांच्या कडकडाटासह आणि वादळी वाऱ्यांसह मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

न्सूनने संपूर्ण महाराष्ट्र व्यापल्यानंतर राज्यात पावसासाठी पोषक वातावरण कायम आहे. गेल्या चार दिवसांपासून राज्यातील अनेक भागांत पावसाची संततधार सुरू असून 27 जून रोजीही अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाने हजेरी लावली. दरम्यान, 28 जून रोजीही राज्यातील 27 जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. काही भागांत विजांच्या कडकडाटासह आणि वादळी वाऱ्यांसह मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

कोकण विभागातील पालघर, ठाणे आणि मुंबई परिसरात विजांच्या कडकडाटासह तसेच वादळी वाऱ्यांसह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाज आहे. या चारही ठिकाणी यलो अलर्ट देण्यात आला आहे. या भागात 30 ते 40 किलोमीटर प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातही वादळी वाऱ्यांसह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

पुणे, सातारा, कोल्हापूर आणि घाटमाथा परिसरात विजांच्या कडकडाटासह वादळी वाऱ्यांसह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज आहे. या भागांसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला असून 40 ते 50 किलोमीटर प्रतितास वेगाने वारे वाहू शकतात. सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांतही वादळी वाऱ्यांसह पावसाची शक्यता कायम आहे.मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, नांदेड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. या भागांत विजांच्या कडकडाटासह आणि वादळी वाऱ्यांसह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. हिंगोली जिल्ह्यातही काही ठिकाणी वादळी वाऱ्यांसह पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.धुळे, नंदुरबार, जळगाव आणि नाशिक जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यांसह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.

नाशिक घाटमाथा आणि अहिल्यानगर जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह पावसाचा अंदाज असल्याने या भागांना यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. विदर्भातील अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम आणि यवतमाळ जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी मध्यम तर काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. सर्व जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. विजांच्या कडकडाटासह 40 ते 50 किलोमीटर प्रतितास वेगाने वारे वाहण्याचा अंदाज हवामान विभागाने दिला आहे.राज्यात पुढील काही दिवस पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तविली आहे. त्यामुळे नागरिकांनी तसेच शेतकऱ्यांनी हवामान विभागाच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.





# अल निनोच्या संभाव्य प्रभावावर मात करण्यासाठी राडीकरांची तयारी

## बी बी एफ तंत्रज्ञानावर सोयाबीन पेरणीला सुरवात

■ अंबाजोगाई प्रतिनिधी :

यंदाच्या खरीप हंगामात अल निनोच्या संभाव्य प्रभावामुळे पावसाचे प्रमाण कमी होण्याची शक्यता हवामान विभागाकडून व्यक्त करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर अंबाजोगाई तालुक्यातील राडी महसूल मंडळातील शेतकऱ्यांनी बीबीएफ आणि सरी वरंबा पद्धतीने पेरणीला सुरुवात केली आहे. कमी पावसाच्या परिस्थितीतही उत्पादन टिकवण्यासाठी आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा अवलंब केला जात आहे.

महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या खरीप मोहीम अंतर्गत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे व तालुका कृषी अधिकारी विजयकुमार पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राडी येथे सोयाबीन पिकासाठी बीबीएफ तंत्रज्ञान व सरी-वरंबा पद्धतीने पेरणी करण्यावर विशेष भर दिला जात आहे.

राडी महसूल मंडळात मागील पाच वर्षांपासून बी बी एफ तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात वापर होत असून मराठवाड्यात या पद्धतीने सोयाबीन लागवडीचे क्षेत्र वाढविण्यात राडी परिसर आघाडीवर आहे. बीबीएफ पद्धतीमुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरण्यास मदत होते, अतिरिक्त पाण्याचा निचरा होतो तसेच जमिनीतील ओलावा अधिक काळ टिकून राहतो. त्यामुळे कमी पावसाच्या परिस्थितीतही पिकाला फायदा होतो.

यंदा अल निनोचा प्रभाव लक्षात घेऊन राडी येथील शेतकऱ्यांनी विविध उपाययोजना सुरू केल्या आहेत. यामध्ये हुमणी किडीच्या नियंत्रणासाठी उपाययोजना, दशपर्णी अर्काचा वापर, रासायनिक खतांचा संतुलित वापर, जमिनीची योग्य मशागत, मूलस्थानी जलसंधारण तसेच उताराच्या विरुद्ध दिशेने सरी तयार करून पेरणी करण्यास प्राधान्य दिले जात आहे. पेरणीपूर्वी बियाण्याची 100 टक्के उगवण क्षमता तपासणी करून रासायनिक व जैविक बीजप्रक्रिया करण्यात येत आहे. त्यामुळे बियाण्याची उगवण क्षमता वाढून पीक जोमदार येण्यास मदत होणार आहे. शेतकऱ्यांनी पारंपरिक पद्धतीऐवजी शास्त्रोक्त पद्धतीचा स्वीकार करण्यास सुरुवात केली आहे.

कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक कृषी अधिकारी किशोर अडगळे हे शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन BBF तंत्रज्ञान, बीजप्रक्रिया, खत व्यवस्थापन व पिकांच्या नियोजनाबाबत मार्गदर्शन करत आहेत. तसेच झाशीची राणी महिला शेतकरी गट आणि रॉयल शेतकरी गटाच्या माध्यमातून शेतकरी आधुनिक शेती पद्धतीचा अवलंब करण्यासाठी पुढाकार घेत आहेत.

# वैज्ञानिकांनी जागतिक पातळीवर पाऊस पाडण्याचे तंत्रज्ञान विकसित करावे : माजी आ. भीमराव धोंडे

## वाढत चाललेले तापमान कमी करण्यासाठी वृक्षारोपण करा : मा.आ. बाळासाहेब आजबे

■ आष्टी ( वार्ताहर)

जागतिक पातळीवर युद्धासाठी नवनविन संशोधन केले जाते त्याप्रमाणे शास्त्रज्ञांनी पाऊस पाडण्याचे तंत्रज्ञान विकसित करावे असे प्रतिपादन माजी आ. भीमराव धोंडे यांनी केले. पर्जन्यवृष्टीसाठी महाजलाभिषेक

व पर्जन्ययागाचा निश्चित फायदा होईल. प्रत्येक वर्षी वाढत चाललेले तापमान कमी करण्यासाठी प्रत्येकाने वृक्षलागवड करून त्यांचे संगोपन करण्याचे आवाहन माजी आ. बाळासाहेब आजबे यांनी केले. माजी आ. भीमराव धोंडे यांच्या संकल्पनेतून आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यासह राज्यात सर्वत्र चांगला पाऊस पडावा, शेतकऱ्यांमध्ये समृद्धी निर्माण व्हावी याकरिता कडा येथील महेश मंदिरात महाजलाभिषेक व पर्जन्ययाग यज्ञाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी महेश कारखान्याचे चेअरमन अजयदादा धोंडे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष काकासाहेब शिंदे, ह.भ.प. बबन महाराज बहिरवाल,अभयराजे धोंडे, भाजपाचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, उपसभापती पांडुरंग नागरगोजे व इतर मान्यवर उपस्थित होते. सकाळी साडेआठ वाजता महेश मंदिरात महाजलाभिषेक व पर्जन्ययागाला सुरूवात झाली.

माजी आ. भीमराव धोंडे यांनी पुढे बोलताना सांगितले की, यापूर्वी शासनाने पावसासाठी अनेक प्रयोग केले. जागतिक पातळीवर वैज्ञानिकांनी पाऊस पडावा यासाठी नविन तंत्रज्ञान विकसित केल्यास सर्वांना याचा फायदा होईल. पावसासाठी महाजलाभिषेक व पर्जन्ययाग हा जिल्ह्यातील पहिला प्रयोग झाला आहे. यज्ञ ही भारतीय जुनी परंपरा आहे. यज्ञ केल्यावर फळ मिळते,भरपूर पाऊस येईल असा मला विश्वास आहे. यावेळी माजी आ. बाळासाहेब आजबे यांनी सांगितले की, शेतकरी एक महिना झाला पावसाची वाट पहात आहे, गतवर्षी भरपूर झाला होता.आज शेतकऱ्यांसह पुणे मुंबईला देखील पावसाची गरज आहे. पावसासाठी कडा येथील महेश मंदिरात केलेल्या महाजलाभिषेक व पर्जन्ययागाचा निश्चित फायदा होईल. भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी सांगितले की, भारतीय पुराणात सांगितल्याप्रमाणे पर्जन्य याग केल्यानंतर पाऊस पडतोच, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले प्रमाणे प्रत्येकाने एक झाड लावून त्याचे संगोपन करावे. यावेळी ह.भ.प.बबन महाराज बहिरवाल,राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष काकासाहेब शिंदे, ॲड. भाऊसाहेब लटपटे, रिपाइंचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे व इतरांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पाटोदा करताना कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती पांडुरंग नागरगोजे यांनी सांगितले की, आष्टी, पाटोदा व शिरुर तालुक्यासह महाराष्ट्रात भरपूर पाऊस पडावा म्हणून शेतकऱ्यांचे नेते माजी आ. भीमराव धोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली व माजी आमदार बाळासाहेब आजबे यांच्या उपस्थितीत महाजलाभिषेक व पर्जन्ययाग करण्यात आला. याचा निश्चित फायदा होईल. यावेळी ह.भ.प. आंधळे महाराज, ॲड. भाऊसाहेब लटपटे, चेअरमन राजेश धोंडे, किसान मोर्चाचे तालुकाध्यक्ष बबनराव औटे, नानाभाऊ वाडेकर, महेश कारखान्याचे व्हाईस चेअरमन दादासाहेब जगताप, रिपाइंचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे, पांडुरंग गावडे, नानाभाऊ वाडेकर, महेश कारखान्याचे संचालक बजरंग कर्डीले, रत्नदीप निकाळजे, बाबा वाघुले, अंकुश मुंढे, मधुकर शिरोळे, अनिल जायभाय, डी. के. कर्डीले, राम कर्डीले, ह.भ.प. पांडुरंग महाराज कर्डीले, माजी सरपंच झुंबर चव्हाण, राजाबापु नलावडे, काकासाहेब कर्डिले, दगडू पारखे, हरिभाऊ जंजिरे, प्राचार्य डॉ. हरिदास विधाते, ह.भ.प. मोरे महाराज, माजी सरपंच संतोष चव्हाण, प्राचार्य डॉ. भगवान वाघुले, विठ्ठल लांडगे, जि.प. चे माजी सदस्य सतीश झगडे, दहातोंडे, चंद्रशेखर साके, प्राचार्य डॉ. संभू वाघुले, घुले, प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, तावरे, प्रा. शिवदास विधाते, डॉ. डी. बी. राऊत, सरपंच माऊली वाघ, प्रा. डॉ . बाळासाहेब धोंडे,माऊली बोडखे, संजय शेंडे, प्रा. डॉ. शाम सांगळे, यांच्यासह परिसरातील महिला व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ५१ पौराहित्य, ५१ जोड्या

■ प्रारंभी महेश मंदिरात सौ. दमयंतीताई भीमराव धोंडे, सौ. अक्षदा अजय धोंडे,सौ. पायल अभय धोंडे यांनी जोडीने महादेवाला महाजलाभिषेक केला त्यानंतर उपस्थित प्रत्येकाने जलाभिषेकात सहभाग घेतला. यावेळी सदानंद जोशी, महेश जोशी, योगेश जोशी, पिनू देवा, पोतदार देवा, अनिल जोशी, अनिल भिवरे, दीपक भिवरे, सूर्यकांत वाळूंजकर,संतोष देवा जोशी यांच्या सह ५१ पौराहित्यांनी पर्जन्ययागाचे पौराहित्य केले केले. सौ. दमयंतीताई भीमराव धोंडे, सौ. सविता बाळासाहेब आजबे,सौ. अक्षदा अजय धोंडे,सौ. पायल अभयराजे धोंडे, सौ. सिंधुताई बबनराव औटे, सौ. मंगलताई हरिदास विधाते, सौ. वंदना सुनिल गाडे, सौ. चक्रवर्ती शाम सांगळे यांच्या सह ५१ जोड्या पर्जन्ययागाच्या विधीसाठी बसल्या होत्या.



# आयर्लंडचा ऐतिहासिक विजय! टीम इंडियाचा ३४ धावांनी पराभव

■ बेलफास्ट : वृत्तसंस्था

बेलफास्ट येथे झालेल्या पहिल्या टी-२० सामन्यात आयर्लंडने विश्वविजेता भारताचा ३४ धावांनी पराभव करत इतिहास रचला. कोणत्याही फॉरमॅटमध्ये भारताविरुद्ध आयर्लंडचा हा पहिलाच विजय ठरला. विशेष म्हणजे, आयर्लंडचे काही प्रमुख खेळाडू संघात नसतानाही त्यांनी दमदार कामगिरी करत भारताला धक्का दिला.

पहिल्या सामन्यातून हे स्पष्ट झाले की, भारताला मर्यादित नेट सत्रांमुळे स्थानिक परिस्थिती आणि खेळपट्टीशी पूर्णपणे जुळवून घेता आले नाही. दुसरीकडे, आयर्लंडने घरच्या मैदानाचा पुरेपूर फायदा घेतला आणि प्रत्येक विभागात प्रभावी कामगिरी केली.

नाणेफेक जिंकल्यानंतर भारताने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र, हा निर्णय अपेक्षित ठरला नाही. सुरुवातीला आयर्लंडने काही विकेट्स गमावल्या असल्या तरी कर्णधार लॉर्कन टकर याने संयमी अर्धशतक झळकावत डाव सावरला. त्यानंतर गॅरेथ डेलानी याने आक्रमक फलंदाजी करत भारताच्या गोलंदाजांवर दबाव निर्माण केला आणि आयर्लंडला १८२ धावांपर्यंत पोहोचवले.

भारताच्या फलंदाजीत अभिषेक शर्मा याने अवघ्या २० चेंडूत अर्धशतक झळकावत संघर्ष केला. मात्र, संजू सॅमसन इशान किशन आणि कर्णधार श्रेयस अय्यर यांच्यासह वरच्या फळीला मोठी खेळी करता आली नाही. त्यामुळे भारतावर सतत दबाव राहिला आणि संघाला पुनरागमन करता आले नाही.

गोलंदाजीत आयर्लंडचा मध्यमगती गोलंदाज मॅट हॉलार्ड सामन्यात निर्णायक ठरला. त्याने परिस्थितीनुसार अचूक गोलंदाजी करत इशान किशन, श्रेयस अय्यर आणि वॉशिंग्टन सुंदर यांच्या महत्त्वाच्या विकेट्स घेतल्या. त्याच्या प्रभावी स्पेलमुळे भारताचा डाव विस्कळीत झाला.

पहिल्याच टी-२० सामन्यातील या विजयासह आयर्लंडने इतिहास रचला, तर भारतासाठी हा पराभव आगामी सामन्यांपूर्वी इशारा मानला जात आहे. मालिकेत पुनरागमन करण्यासाठी भारतीय संघाला फलंदाजी, गोलंदाजी आणि स्थानिक परिस्थितीशी जुळवून घेण्यावर अधिक भर द्यावा लागणार आहे.




## भारतापुढे बांगलादेशचे सपशेल लोटांगण, त्यांच्याच घरात जाऊन साकारला सर्वात मोठा विजय

■ मुंबई वृत्तसंस्था

बांगलादेशने महिलांच्या कबड्डी वर्ल्ड कप स्पर्धेचे संयोजन करून भारतीय संघास आव्हान देण्याची तयारी दाखवली. मात्र, भारतीय महिला संघाने बांगलादेशला प्रतिकाराचीही फारशी संधी दिली नाही. भारतीय संघाने दुसऱ्या सामन्यातही आपल्या सर्व खेळाडूंना खेळवले. त्यानंतरही ४३-१९ असा २४ गुणांनी सहज विजय मिळवला.

बांगलादेशमधील मीरपूर येथील शाहिद सुखवर्दी इनडोअर स्टेडियममध्ये सुरू असलेल्या या स्पर्धेत चाहत्यांनी या सामन्याच्यावेळी चांगली गर्दी केली होती. आपल्या बांगलादेश संघास ते जोरजोरात ओरडून प्रोत्साहनही करीत होते. मात्र भारतीयांनी धडाकेबाज खेळ करीत चाहत्यांचा आवाजही बंद केला. धडाकेबाज सुरूवात करणाऱ्या भारताने सातव्या मिनिटांस लोण देत १२-५ अशी आघाडी घेतली. विश्रांतीनंतर भारतीयांनी आपल्या राखीव खेळाडूंना अधिकाधिक संधी देण्यास सुरुवात केली. त्यानंतरही उत्तरार्धात एक लोण देत भारतीयांनी आपला एकतर्फी विजय निश्चित केला. पूर्वार्ध तसेच उत्तरार्धातील प्रत्येकी एक अव्वल पकड सोडल्यास बांगलादेशला या सामन्यात फारसे काही साधले नाही.

भारताच्या विजयात सर्वाधिक प्रभाव पाडला तो संजूदेवीने. तिने सहा चढायांत पाच गुण मिळवले. पूजाने चार चढायात दोन बोनससह तीनगुण मिळवले. सोनाली शिंगटेने चार चढाता दोन बोनस आणि तीन गुणांची कमाई केली. पुष्पाने सहा चढायात चार गुण मिळवले, पण तिची एकदा अव्वल पकड झाली. कर्णधार रितू नेगी, साक्षीचा भक्कम बचावाने बांगलादेशचे आक्रमण




निष्प्रभ केले.

भारतीय संघाच्या प्रशिक्षिका कविता सेल्वराज यावेळी म्हणाल्या की, " आम्ही मोठ्या विजयाकडे कधीच लक्ष दिलेले नाही. आमचा प्रयत्न फारसा धोका न पत्करता यश मिळवण्याचे आहे. सलामीच्या दोन सामन्यात हे नक्कीच साधले आहे. आमच्या संघातील सर्वच खेळाडू सर्वोत्तम आहेत. अंतिम टप्प्यातील आव्हानासाठी सर्व खेळाडू तयार असतील याकडे आम्ही लक्ष देणार आहोत. " प्रो कबड्डी खेळणारा हा खेळाडू घडवतोय उद्याचे कबड्डीपटू इराणचा प्रभाव कायम सलामीला केनियाला ४२-१० असे हरवणाऱ्या इराणने झांजीबारला ५१-१५ असे हरवले. त्यांनी भारताप्रमाणेच अंतिम टप्प्यासाठी ताकद राखून ठेवली आहे. भारताचा समावेश असलेल्या अ गटातील लढतीत थायलंडने युगांडाला ५१-३७ असे हरवले. इराणचा समावेश असलेल्या ब गटात नेपाळने पोलंडला ६३-२५ असे हरवले. नेपाळ परतीच्या लढतीत तैवानविरुद्ध १५-३१ असे पराभूत झाले.

## ऑस्ट्रेलियाची बाद फेरीत धडक; पॅराग्वेच्याही आगेकूचची शक्यता

■ सँटा क्लारा, कॅलिफोर्निया :

ऑस्ट्रेलिया आणि पॅराग्वे यांच्यातील सामना गोलशून्य (०-०) बरोबरीत सुटल्यामुळे 'सॉकरूस' (ऑस्ट्रेलिया) संघाने फिफा विश्वचषकाच्या बाद फेरीत आपले स्थान निश्चित केले आहे. या निकालामुळे ऑस्ट्रेलियाने गटात दुसरं स्थान पटकावले असून, पॅराग्वेलाही चार गुणांसह बाद फेरीत जाण्याची दाट शक्यता आहे.




### सामन्याचा आढावा

सामन्यात दोन्ही संघांनी अत्यंत सावध पवित्रा स्वीकारला होता. ऑस्ट्रेलियासाठी जॅक्सन इर्विन आणि क्रिस्टियन व्होल्पाटो यांनी गोल करण्याचे प्रयत्न केले, परंतु पॅराग्वेचा गोलकीपर ऑर्लैंडो गिलने चपळाईने बचाव करत त्यांचे मनसुबे उधळून लावले. सामन्याच्या ९० व्या मिनिटाला ऑस्ट्रेलियाच्या जॉर्डन बॉसला सुवर्णसंधी मिळाली होती, मात्र त्याचा फटका गोलपोस्टच्या बाहेर गेला. संपूर्ण सामन्यात दोन्ही संघांना गोल करण्यात अपयश आले.

### ऐतिहासिक वाटचाल

ऑस्ट्रेलियाने तिसऱ्यांदा विश्वचषकाच्या नॉकआउट फेरीत प्रवेश केला आहे. यापूर्वी २००६ आणि २०२२ मध्ये त्यांनी ही कामगिरी केली होती. ऑस्ट्रेलियाचा संघ ३ जुलै रोजी अर्लिंग्टन, टेक्सास येथे ३२ संघांच्या फेरीत (Round of 32) मैदानात उतरेल. त्यांचा पुढील प्रतिस्पर्धी गट 'जी' मधील उपविजेता संघ असेल.

### प्रशिक्षक आणि संघ बदल

ऑस्ट्रेलियाचे प्रशिक्षक टोनी पोपोविच यांनी या सामन्यासाठी संघात सहा महत्त्वपूर्ण बदल केले होते. यामध्ये १८ वर्षीय लुकास हेरिंग्टनला विश्वचषकात पदार्पण करण्याची संधी मिळाली. हेरिंग्टन हा विश्वचषक सामन्यात खेळणारा सर्वात तरुण ऑस्ट्रेलियन खेळाडू ठरला आहे. दुसरीकडे, पॅराग्वेचा मिडफिल्डर दिएगो गोमेझला सलग दुसरे पिवळे कार्ड मिळाल्यामुळे, पॅराग्वे पुढील फेरीत पोहोचल्यास तो ३२ संघांच्या फेरीतील सामन्याला मुकणार आहे.

### भविष्यातील समीकरण

पॅराग्वेचा बाद फेरीतील प्रवेश आता इतर सामन्यांच्या निकालावर अवलंबून असला, तरी सध्याच्या गुणतालिकेनुसार त्यांची स्थिती मजबूत आहे. ऑस्ट्रेलियाने मात्र आपली नॉकआउट फेरीतील जागा पक्की करून चाहत्यांना दिलासा दिला आहे.

## कबड्डी स्पर्धा : अमर क्रीडा, श्री संस्कृती प्रतिष्ठान, शताब्दी स्पोर्टस् उपांत्य फेरीत दाखल

■ मुंबई: वृत्तसंस्था

अमर क्रीडा, श्री संस्कृती प्रतिष्ठान, शताब्दी स्पोर्टस् यांनी वरळीच्या नवमित्र क्रीडा मंडळाने आपल्या "सुवर्ण महोत्सवी" वर्षानिमित्त आयोजित केलेल्या द्वितीय श्रेणी (ब) गटाच्या कबड्डी स्पर्धेते उपांत्य फेरीत धडक दिली. ओम् साईनाथ सेवा विरुद्ध खेळणारा संघ वेळेत उपस्थित न राहिल्याने त्यांना देखील उपांत्य फेरीत खेळण्याचा मान मिळाला.

अमर मंडळ विरुद्ध श्री संस्कृती, शताब्दी विरुद्ध ओम साईनाथ सेवा अशा उपांत्य लढती होतील. मुंबई शहर कबड्डी असो. च्या मान्यतेने वरळी येथील वरळी स्पोर्टस् क्लबच्या "स्व. यशवंत साळवी मॅटच्या क्रीडांगणावर "स्व. दीपक वेर्लेकर चषका" करिता होणाऱ्या आजच्या तिसऱ्या दिवशीच्या पहिल्या सामन्यात अमर मंडळाने श्री साई क्लबला २४-२३ असे चकवित आपली आगेकूच सुरू ठेवली.



विश्रांतीला लोण देत १६-०५ अशी आघाडी घेणाऱ्या अमरला विश्रांतीनंतर श्री साईने विजयासाठी चांगलेच झुंजविले. विश्रांतीनंतर लोण देत तसेच २ अव्वल पकड करीत सामना रंगतदार अवस्थेत नेला. पण विजयाचे ध्येय काय त्यांना गाठता आले नाही. अमरच्या या निसटत्या विजयात यश येळमकर, अनिकेत वारंग यांचा चढाई पकडीचा धूर्त व संयमी खेळ महत्त्वपूर्ण ठरला. नितेश पाटील, तेजस गायकवाड, संदेश पाटील यांचा खेळ श्री साईला विजयी करण्यात कमी पडला. श्री संस्कृतीने पूर्वार्धातील ५-७ अशा पिछाडीवरून आंबेवाडीचा प्रतिकार २१-१५ असा मोडत उपांत्य फेरी गाठली. ऋषिकेश शिंदे, यश माचीवले यांच्या सुरुवातीच्या खेळाने आंबेवाडीने पूर्वार्धात आघाडी घेण्यात यश मिळविले होते. पण उत्तरार्धात संस्कृतीच्या विनायक यादव यांनी एका चढाईत ३ गडी टिपत संघाचा विजयाचा मार्ग मोकळा केला. त्याला अमन राणाची चढाईत, तर रोशन रायची पकडीची उत्कृष्ट साथ लाभली. शेवटच्या सामन्यात शताब्दी स्पोर्टस् ने विजय बजरंग संघाला २३-१६ असे नमवित उपांत्य फेरी गाठली. सावध सुरुवात करीत पहिल्या डावात ९-७ अशी आघाडी घेणाऱ्या शताब्दीने दुसऱ्या डावात देखील तोच मार्ग अवलंबित आपला विजय निश्चित केला. प्रो कबड्डी खेळणारा हा खेळाडू घडवतोय उद्याचे कबड्डीपटू करण जैसवाल शताब्दी कडून, तर दर्शन कांबळे विजय बजरंग कडून उत्कृष्ट खेळले. या मंडळाच्या स्थापनेत ज्यांनी महत्वाचा सहभाग घेतला व मंडळाच्या जडण घडणेत ज्यांचा मोलाचा वाटा होता अशा व्यक्तींचा या स्पर्धेच्या निमित्ताने यथोचित सन्मान करण्यात आला.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# क्रांतीचा महानायक आणि दलित पँथरचा बुलंद आवाज: भास्करनाना रोडे यांना वाढदिवसाच्या क्रांतिकारी शुभेच्छा!

## परळीच्या मातीत चळवळीची मशाल पेटवणारे लढवय्ये पँथर

विश्वरत्न भारतरत्न भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी या भारत देशामध्ये जातीव्यवस्थेविरुद्ध धर्म व्यवस्थेविरुद्ध व येथील सनातनी विचारधारे विरुद्ध केलेले बंड जगाचा इतिहासामध्ये याला तोड नाही. या मानव मुक्तीच्या लढ्याला कोणतीही रक्तरंजित क्रांती न करता आपल्या वैचारिक अधिष्ठानने लेखणीच्या जोरावर परिश्रमाच्या जोरावर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी हजारो वर्षांपासून गुलामगिरी मध्ये कितपत पडलेल्या धर्म व्यवस्थेच्या गुलाम बनलेल्या बहुजन समाजाला त्यांच्या गुलामगिरीची जाणीव करून त्यांच्यामध्ये विद्रोहाची चिंगारीपेटवण्याचे काम डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी केले.हजारो वर्षांपासून या गुलाम समाजाला धर्म व्यवस्थेपासून जातिव्यवस्थेपासून मुक्त करून या समाजाला स्वतःच्या पायावर स्वाभिमानाणे उभे करण्याचे काम केलं हे काम डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी एका दिवसात एका रात्रीत केलेलं नाही त्यासाठी त्यांनी अनेक लढे उभारले अनेक वेळा संघर्ष करावा लागला.

आपल्या सुखमय संसाराची राख रांगोळी करावी लागली आपल्या पुढच्या चार गोळ्यांना गमावे लागले आणि लोकांच्या शिव्या तिरस्कार व जीव घेणे हल्ले झाले. आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर त्यांनी या समाजामध्ये समानता आणण्यासाठी भारतीय राज्यघटनेमध्ये तरतूद केली येथील समाज हा जाती व्यवस्थेमध्ये कायमचा वाटलेला आहे. ही जाती व्यवस्था नाकारून मानवतावाद निर्माण करण्याचा महत्त्वाचा प्रयत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून केला. परंतु आजही प्रत्येक माणसाच्या मनामनामध्ये जात घर करून आजही जिवंत आहे. जातीय व्यवस्था सोडायला येतील लोकांची मानसिकता अजून तयार झालेली नाही जातीसाठी माती खाण्याची प्रवृत्तीआजही प्रचंड मोठ्या प्रमाणामध्ये भारतीय समाज व्यवस्थेमध्ये जिवंत आहे. जातीसाठी धर्मासाठी अनेक लोकांचे मृदे पाळण्याची प्रवृत्ती आजही या समाजामध्ये फार मोठ्या प्रमाणात जिवंत आहे. खरोखरच भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी येथील अस्पृश्य बहुजन समाजाला त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी जो त्याग केलेला आहे त्या त्यागाला त्या संघर्षाला मानवी मुक्ती लढ्याला त्यांच्या लढ्याला इतिहासामध्ये तोड नाही. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेमध्ये बहुजन समाजाला अस्पृश्य मागासवर्गीय समाजाला त्यांच्या पायावर उभे राहावे म्हणून जातीच्या आधारे त्यांना आरक्षण देण्याची तरतूद केलेली आहे यात आरक्षणामुळे येथी दलित शोषित पीडित अस्पृश्य बहुजन मागासवर्गीय आदिवासी समाजामध्येप्रचंड प्रमाणामध्ये प्रगती करण्याचं काम करत आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे निधनानंतर दलित समाजामध्ये मरगळ आलेली होती. या दलित समाजाला निस्वार्थी नेतृत्व लाभलेले नव्हते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी हा समतेचा रथ पुढे नेण्याचं काम केलं होतं ही चळवळ गतिमान केली होती या चळवळीला अनेक लोकांनी खीळ घालण्याचं काम केलं डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी या समाजाला जातीयवादी पक्षापासून दूर राहा हा संदेश दिलेला होता.

परंतु स्वतःच नेतृत्व करण्यासाठी स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी येथील अनेक नेत्यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची विचारधारा पायदळी तुडवून स्वतःचे नेतृत्व उभे करून तिची दलित समाजाला वेगवेगळ्या गटामध्ये विभागणी करण्याचे काम केलं. तो काळ अत्यंत वाईट परिस्थितीचा काळ होता त्या काळामध्ये संपूर्ण भारतामध्ये अनेक ठिकाणी दलितावर अन्याय अत्याचार प्रचंड प्रमाणामध्ये चालला होता.खेड्यापाड्यांमध्ये अनेक दलित मागासवर्गीय बहुजन समाजातील स्त्रियांच्या धिंड काढल्या जायच्या अनेक लोकांच्या शेतावर न गेल्यामुळे त्या गावांमध्ये बहिष्कार टाकला जायचा अनेक लोकांनी शेतात काम करण्यास नकार दिल्यामुळे गावा त त्या माणसावर बहिष्कार टाकला जायचा अनेक बहुजन समाजातील लोकांनी खेडेपाडे सोडून शहरांमध्ये स्थलांतर करण्याचं काम सुरू केलं होतं त्यामुळे खेड्यापाड्यांमध्ये जातीय गाडा चालवण्यासाठी आवश्यक असलेली माणसं सापडत नव्हती त्यामुळे खेड्यापाड्यांमध्ये प्रचंड प्रमाणामध्ये अन्याय अत्याचाराची परिशिमा मुलांनी केली होती खेड्यापाड्यामध्ये अनेक गोरगरीब सामान्य बहुजन समाजातील मागासवर्गीय दलित माणसांच्या घरादारांची राख रांगोळी केली जात होती जातीच्या नावावर धर्माच्या नावावर येथील माणसांना जिवंत जाळण्याचा काम येथील व्यवस्था करत होती त्याच काळामध्ये महाराष्ट्रात अनेक शिकलेल्या फुले आंबेडकर चळवळीची विचारधारा आपल्या डोक्यात घेऊन या समाजाच्या उत्थानासाठी संघर्ष करणाऱ्या अनेक प्राध्यापक साहित्यिक लेखक डॉक्टर इंजिनियर्स समाजसेवकांनी एकत्र येऊन दलित पँथर नावाची एक विद्रोही संघटना स्थापन केली या संघटनेच्या माध्यमातून अनेक गोरगरीब सामान्य माणसाला बहुजन समाजाला दलित समाजाला हक्काचे व्यासपीठ



निर्माण करून देणे ज्या ज्या ठिकाणी दलित समाजावर अन्याय अत्याचार होईल त्या त्या ठिकाणी जाऊन त्याला प्रत्युत्तर देण्याचे काम करणे दलित समाजाला शिक्षणाच्या माध्यमातून पुढे नेण्याचं काम करणे इथली युवकांमध्ये डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे विचारधारेचा प्रसार करून त्यांना स्वतःच्या पायावर उभे करण्याचे काम त्यांना अन्याय अत्याचारावीमधील लढण्याची कामअशा प्रकारची ही चळवळ प्रचंड मोठ्या प्रमाणामध्ये निर्माण झाली त्यामध्ये नामदेव ढसाळ राजा ढाले भाई शृंगारे जरा पवार प्राध्यापक अरुण कांबळे अशा अनेक साहित्यिक लेखक लोकांनी पुढाकार घेऊन या संघटनेला हत्तीचं बळ देण्याचं काम केलं खेड्यापाड्यामध्ये जाऊन दलित समाजावर होणारे अन्यायअत्याचारा विरुद्ध महायुद्ध पुकारण्याचे काम केले.

याच कालखंडामध्ये मराठवाडा विद्यापीठात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे नाव मिळावे यासाठी फार मोठे जण आंदोलन सुरू झाले होते ज्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी मागास अशा मराठवाड्यामध्ये सर्वप्रथम मिलिंद महाविद्यालयाची स्थापना करून येथील घराघरांमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्याचं काम केलेलं होते या जागतिक दर्जाच्या शिक्षण तज्ञ च्या नावासाठी येथील दलित समाजाने विद्रोहाची मशाल हाती घेऊन डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे नाव मिळालं पाहिजे म्हणून फार मोठे जण आंदोलन सुरू केलं होतं या आंदोलनामध्ये सर्व समाजाचे लोक सामील झालेले होते परंतु काही जातीवादी लोकांनी या लढ्याला विरोध करून खेड्यापाड्यांमध्ये दलित समाजाच्या वस्त्यावर हल्ले करणे दलित वस्त्या जाळण्याचे काम करणे अनेक दलितांना जिवंत जाळण्याचे काम करणे दलित समाजावर अन्याय अत्याचार करून या समाजाला निस्तनाबूत करण्याचं काम हीच जातीयवादी मंडळींनी सुरू केले होते परंतु डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या नावासाठी खूप नवे देंगे जान भी देंगे लेकिन नामांतर लेके रहेंगे या घोषणांनी संपूर्ण मराठवाडा पेटून उठला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे नाव मिळावं म्हणून घराघरातला माणूस पेटून उठला आणि नामांतराच्या लढ्यामध्ये सक्रिय सहभागी झाला या चळवळीमध्ये या लढ्यामध्ये दलित पँथरचे देखील फार मोठ्या प्रमाणामध्ये योगदान आहे. दलित पँथरच्या चळवळीने संपूर्ण महाराष्ट्रामध्ये दलित समाजातील तरुणांमध्ये विदर्भाची मशाल पटवण्याचे काम केले ज्या ज्या ठिकाणी गोरगरीब सामान्य माणसावर अन्याय अत्याचार होत असेल त्या त्या अन्याय अत्याचाराविरुद्ध एल्गार बंड पुकारण्याचे काम येथील दलित पँथरच्या कार्यकर्त्यांनी केले. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा विचार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी या समाजासाठी दिलेले योगदान न विसरता बाबासाहेबांची विचारधारा प्रत्येक माणसाच्या मनामनामध्ये रुजवण्याचं काम दलित पँथरच्या चळवळीने केली ही चळवळ दलित समाजाचा स्वाभिमान वाढवणारी विद्रोहाची भावना निर्माण करणारी जातीसाठी माती खाण्याची प्रवृत्ती निर्माण करणारी निस्वार्थीपणाने बाबासाहेबांचे विचार झालेला आत्मसमोर पण निर्माण करणारे हे चळवळ फार मोठ्या प्रमाणामध्ये निर्माण झाली होती.

परळी परिसरामध्ये देखील या चळवळीने फार मोठे स्थान निर्माण केले होते बीड जिल्ह्यामध्ये ज्या ज्या ठिकाणी अन्याय अत्याचार होत असेल दलितावर होणाऱ्या अन्य अत्याचाराला प्रत्युत्तर देण्याचे काम त्या काळातील अनेक पँथरसनी केले दलित पँथरचा तो काळ खरोखरच फार मोठा काळ होता या काळामध्ये अनेक लढवय पँथ निर्माण झाले परळी शहरातील भिमाडे या परिसराने या पँथरच्या लढाईची चळवळीची नेतृत्व केले या चळवळीने अनेक कार्यकर्ते व लढवय पँथर देण्याचे काम केले धमानंदजी मुंडे भास्कर नाना रोडे गंगाधर आप्पा रोडे संभाजी कांबळे एम सी ताटे प्रल्हाद ताटे आर डी लांडगे वसंत जाधव नारायण रायपुरे विष्णू गोदाम लक्ष्मण अधोडे आर एच हावळे अशा अनेक पँथरचा संच निर्माण झाला या लोकांनी स्वतःच्या घरादाराची परवा न करता समाजाच्या हितासाठी संपूर्ण आयुष्य वेचण्याचं काम केलं संपूर्ण आयुष्य हे फुले आंबेडकरी चळवळीला वाहण्याचा काम केलं आदरणीय भास्कर नाना रोडे यांनी देखील या चळवळीमध्ये सक्रिय सहभाग घेऊन अनेक आंदोलने मोर्चे यामध्ये सक्रिय सहभागी होऊन नामांतराच्या लढ्यामध्ये तुरुंगवास होऊन दलित चळवळीमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे काम केलेला आहे नामांतराच्या लढ्यामध्ये सक्रिय सहभागी होऊन डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या नामांतरासाठी संपूर्ण ताकतीने या लढ्याला यशस्वी करण्याचे काम आदरणीय भास्कर नाना व त्यांच्या पँथरसनी त्या काळामध्ये करण्याचं काम केलं आहे आदरणीय भास्कर नाना रोडे यांनी ज्या ज्या भागांमध्ये दलित माणसावर अन्याय अत्याचार होत असेल त्यांनी अत्याचाराविरुद्ध बंड करण्याचे काम त्यांनी केलेला आहे. अनेक गोरगरीब माणसांना न्याय मिळवून देण्याचे काम त्यांनी केलेला आहे कामगारांच्या प्रश्नासाठी त्यांनी दलित पँथर ट्रेड युनियनच्या माध्यमातून अनेक लढाई संघर्ष उभे करून अनेक गोरगरीब कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केलेले आहेत आदरणीय भास्कर नाना रोडे यांनी या चळवळीला संपूर्ण आयुष्य देण्याचं काम केलेलं आहे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची विचारधारा तळ हातावर फोडाप्रमाणे जपून या चळवळीला फार मोठे योगदान देण्याचे काम त्यांनी केलेला आहे या चळवळीला योगदान देत असताना त्यांना अनेक वेळा तुरुंगवास देखील बघण्याचं काम झालेलं आहे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची विचारधारा खऱ्या अर्थाने खेड्यापाड्यांमध्ये प्रचंड प्रमाणामध्ये पसरण्याचं काम आदरणीय भास्कर जी रोडे यांनी केलेला आहे हा समतेचा बंधुत्वाचा लढा निकरीने जिद्दीने कष्टाने पुढे नेण्याचे काम त्यांनी केलेला आहे संपूर्ण महाराष्ट्रभर दलित पँथरच्या चळवळीला पुढे नेण्यासाठी त्यांनी योगदान देण्याचे काम केलेलं आहे. आदरणीय भास्कर रोडे यांनी दलित पँथरच्या चळवळीला फुले आंबेडकर चळवळीला फार मोठा योगदान देण्याचे काम केलेला आहे.

निस्वार्थीपणाने या चळवळीला मोठे करण्याचे काम त्यांनी केलेला आहे फुले आंबेडकर चळवळ जिवंत ठेवण्यासाठी आदरणीय भास्कर रोडे व त्यांच्या टीमने संपूर्ण हयात बरबाद करण्याचं काम केलेलं आहे. त्यांच्या कार्याला त्यांच्या जिद्दीला सलाम त्यांचं कार्य हे असंच लोकांना प्रेरणादायी आदर्शवादी ठरत जावो हीच त्यांच्या वाढदिवसानिमित्त भगवान गौतम बुद्ध यांच्या चरणी कोटी कोटी प्रार्थना. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना कोटी कोटी हार्दिक शुभेच्छा. त्यांच्या संपूर्ण कुटुंबीयाला क्रांतिकारी जय भिम.

# मारण्याची धमकी देणारे खा.संजय दिना पाटील लोकशाहीचे गुन्हेगार आहेत; सरकार त्यांना कोणती कठोर शिक्षा देणार?

उत्तर-पूर्व मुंबईचे शिवसेना खासदार संजय दिना पाटील यांनी पत्रकारांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ २५ जून २०२६ ला केली.माध्यमांचे काही प्रतिनिधी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केल्यानंतर गुरुवारी प्रतिक्रिया घेण्यासाठी गेले असता, खासदार संजय दिना पाटील यांना प्रश्न विचारला तुमची मुलगी राजुल पाटील या अजूनही उद्धव ठाकरे सोबतच का राहिल्या, असा प्रश्न पत्रकारांनी विचारताच पाटील संतापले व पाटील यांच्या जिभेवरील ताबा सुटला आणि त्यांनी पत्रकारांना कॅमेरा बंद करण्यास सांगितले.खूप दिवस सहन केले,आता उगाच डोक्यात जाऊ नका. माझ्या घराखाली तुम्हाला उभे करतो. जेवायला देतो.मी जे बोलत आहे ते रेकॉर्ड करा.कमिशनरकडे जाऊन कम्प्लेंट करा अशा पध्दतीने पाटील यांनी थेट पत्रकारांनाच अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. "परत आलात तर मारून पाठवेन, हे मी तुम्हाला पोलिसांसमोर सांगतोय...तुम्हाला काय करायचं ते करा", अशी अरेरावीची भाषा पाटील यांनी वापरली.तसेच, "याची तक्रार पोलिसांकडे केली तरीही मला फरक पडणार नाही.

पुन्हा असे केलेत तर तुम्ही पत्रकार आहात आणि मी खासदार आहे हे विसरून जाईन",असा गर्भित इशाराही त्यांनी माध्यमांच्या प्रतिनिधींना दिला.संजय पाटील असेही म्हणतात,माझ्या वाटेला जाणाऱ्यांना मी एकतर हॉस्पिटलमध्ये पाठवेल नाहीतर स्मशानात! आमच्या घराण्यात आम्ही एकेकाळी ५ लोकांचे खून पाडलेत,अशी फुशारकी मारली होती.यावरून स्पष्ट होते की, खासदार संजय दिना पाटील गुंड, क्रिमिनल,भ्रष्टाचारी, खुनी, बेजबाबदार प्रवृत्तीचे व्यक्ती आहेत.देशातील प्रत्येक पत्रकारांना लोकप्रतिनिधींना उलटसुलट प्रश्न विचारण्याचा संपूर्ण अधिकार आहे आणि असतो. कारण प्रत्येक प्रश्नातुनच उत्तर मिळत असते आणि निराकरण होते त्यालाच पत्रकारिता म्हणतात.परंतु कलंकीत आणि गुंड खासदार संजय दिना पाटील



यांनी आपली संपूर्ण हद्दपार करून माध्यमांच्या प्रतिनिधींवर चिखलफेक केली आहे ही चिखलफेक देश, राज्य, राज्यातील जनता आणि चौथास्तंभ कधीच विसरणार नाही.कारण लोकप्रतिनिधी जर मारण्याची धमकी देत असेल तर ही कसली लोकशाही म्हणावी आणि कसले खासदार म्हणावे.

खासदार संजय दिना पाटील यांच्या धमकीमुळे आज माध्यम किंवा पत्रकारांमध्ये असामंजस्यतेचे वातावरण निर्माण झाले आहे.लोकप्रतिनिधींनी लक्षात ठेवले पाहिजे की, माध्यम किंवा पत्रकार देशापुढे सत्य परिस्थिती आणण्यासाठी मरायला सुध्दा भीत नाही ही बाब खासदार संजय दिना पाटील यांनी लक्षात ठेवली पाहिजे.देशातील अनेक पत्रकारांनी व माध्यमांच्या प्रतिनिधींनी युद्धजन्य परिस्थिती,भुकंप,सुनामी, आपात्कालीन परिस्थिती, आंदोलने, भयावह घटना अशा अनेक कठीण प्रसंगाच्या ठिकाणी जाऊन सतत कार्य करीत असतात व करीत आहे आणि समाजापुढे व देशापुढे संपूर्ण सत्यता प्रकाशित व्हावी यासाठी आपल्या प्राणांची आहुती सुद्धा देतात. ही बाब संजय दिना पाटील यांनी विसरू नये. संजय पाटील यांना लोकांनी निवडून दीले त्यामुळे ते खासदार झाले आणि आता त्यांना खासदारकीची जास्त गर्मी चढल्याचे दिसून येते.आता प्रश्न आहे की, माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे खासदार संजय दिना पाटील यांची गुंडगिरीची गर्मी कोणत्या पध्दतीने उतरवितात.माझ्यामते संजय दिना पाटील यांच्या गल्लिच्छ वागणूकीमुळे व गुंडागर्दीच्या भाषेमुळे त्यांना खासदारकीच्या पदावर रहाण्याचा तिळमात्र अधिक नाही.कारण पाटील यांनी चौथ्यास्तंभाला व लोकशाहीला मलीन करण्याचे काम केले आहे. पाटील यांच्या दिलगिरीवर (माफीनाम्यावर) सरकार त्यांना जर क्लीन चिट देत असेल तर ही लोकशाहीची जाहीर हत्याच म्हणावी लागेल.कारण आज जर सरकारने संजय दिना पाटील यांच्यावर कठोर कारवाई केली नाही व मोकळे सोडले तर अनेक लोकप्रतिनिधी त्यांच्याच रांगेत बसायला वेळ लागणार नाही हेही तितकेच सत्य आहे.त्यामुळे संजय दिना पाटील यांना ताबडतोब खासदार (लोकप्रतिनिधी) पदावरून बरखास्त करायला हवे.त्याचप्रमाणे माध्यमांच्या प्रतिनिधींना दिलेल्या धमकीचा व्हिडिओ लक्षात घेता ताबडतोब गुन्हा दाखल करून कठोर शिक्षा ठोठावली पाहिजे.कारण आता संजय दिना पाटील खासदार नसून राज्यासह देशाचा मोठे गुन्हेगार आहेत.माननीय मुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडणवीस यांनी नुकतेच निर्देश दिले की, महाराष्ट्रात पत्रकारांवर वाढते हल्ले व धमक्यांच्या घटना लक्षात घेता "महाराष्ट्र पत्रकार व वृत्त माध्यम कर्मचारी संरक्षण कायदा २०१७ नुसार पत्रकारांवरील हल्ला हा दखल पात्र व अजामीनपात्र गुन्हा आहे.अशा पध्दतीचे निर्देश पोलीस विभाग, गृहविभाग व सर्व जिल्हाधिकाऱ्यांना लागू होतात. याच कायद्याच्या अंतर्गत संजय दिना पाटील यांना ताबडतोब कठोर शिक्षा द्यायला हवी.जय हिंद.

**■ लेखक रमेश कृष्णराव लांजेवार( स्वतंत्र पत्रकार )**

# आष्टी-डोईठाण रस्त्यावर भरदिवसा महिलेचे मंगळसूत्र लांबवले; नागरिकांमध्ये घबराट

**■ आष्टी प्रतिनिधी :**



आष्टी-डोईठाण रस्त्यालगत असलेल्या कार्तिक हॉटेल जवळ शेतात काम करणाऱ्या एका महिलेचे मंगळसूत्र दुचाकीवरून आलेल्या दोन चोरट्यांनी भरदिवसा जबरदस्तीने हिसकावून नेल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात महिलांमध्ये प्रचंड घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मंगल पोकळे असे पीडित महिलेचे नाव असून, त्या आष्टी-डोईठाण रस्त्यावरील कार्तिक हॉटेल जवळ आपल्या शेतात काम करत होत्या. दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास रस्त्यावरून एका मोटरसायकलवर दोन चोरटे आले. त्यांनी संधी साधून मंगल पोकळे यांच्या गळ्यातील मंगळसूत्र जबरदस्तीने वरबडले आणि तेथून वेगाने पळ काढला.

हा प्रकार लक्षात येताच शेजारी असलेल्या नागरिकांनी तातडीने त्या चोरांचा पाठलाग केला. मात्र, चोरटे वेगाने पसार होण्यात यशस्वी ठरले आणि ते हाती लागू शकले नाहीत. भरदिवसा आणि गजबजलेल्या रस्त्याच्या कडेला अशा प्रकारे चोरीची घटना घडल्याने स्थानिक नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. दिवसाढवळ्या होणाऱ्या या चोऱ्यांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असून, पोलिसांनी या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देऊन चोरांचा तात्काळ बंदोबस्त करावा, अशी आग्रही मागणी आता नागरिकांकडून केली जात आहे.

# जिजाऊंच्या गर्भसंस्कारातून घडले शिवराय; आजच्या मातांनीही सात्तिवक संस्कार जोपासावेत : ह.भ.प. भागवत बादाडे महाराज

**■ आष्टी प्रतिनिधी**



"राजमाता जिजाऊ यांनी गर्भावस्थेत भावार्थ रामायण यासह धर्मग्रंथांचे श्रवण-वाचन करून आपल्या पोटी छत्रपती शिवाजी महाराजांसारखा पराक्रमी, धर्मनिष्ठ आणि राष्ट्रपुरुष घडविला. गर्भावस्थेतील आईचे विचार, संस्कार, वाचन आणि जीवनशैली यांचा भावी पिढीच्या जडणघडणीवर परिणाम होत असतो. त्यामुळे आजच्या मातांनीही सात्त्विक विचार, संतसाहित्य, धर्मग्रंथांचे वाचन आणि सकारात्मक वातावरणाचा अंगीकार करणे ही काळाची गरज आहे," असे प्रतिपादन ज्ञानेश्वरीकंठस्थ ह.भ.प. भागवत बादाडे महाराज यांनी केले.

ते माऊली सप्ताहानिमित्त आयोजित भागवत कथा ज्ञानयज्ञात प्रवचन करत होते.

गर्भसंस्काराचे महत्त्व स्पष्ट प्रवचनात महाराज म्हणाले की, गर्भसंस्कार ही भारतीय संस्कृतीची महान परंपरा आहे. आईच्या मनातील विचार, तिचे आचरण, आहार, वाचन आणि वातावरण याचा थेट परिणाम गर्भातील बाळावर होत असतो. त्यामुळे गर्भावस्थेत सात्त्विक जीवनशैली स्वीकारणे, संतवाङ्मय, रामायण, महाभारत, भागवत यांसारख्या धर्मग्रंथांचे श्रवण-वाचन करणे आवश्यक आहे. यामुळे सुसंस्कृत, चारित्र्यवान आणि राष्ट्राभिमानी पिढी घडण्यास मदत होते. माऊली सप्ताहातील भागवत कथेसाठी परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रवचनाचा लाभ घेतला. संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता. यावेळी दमयंतीताई भीमराव धोंडे, विठ्ठलराव बनसोडे, राजेंद्र धोंडे, रंगनाथ धोंडे,दीनकर तांदळे महाराज दत्तात्रय निंबाळकर डॉ चंद्रकांत गोसावी, भाऊसाहेब कोकणे, अजिंक्य तुपे,बलभिम धोंडे, काळे साहेब, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
● बीड, रविवार 28 जून 2026
Last page





# माऊली महाराज चाकरवाडीकर यांच्या 26 व्या पुण्यतिथी सप्ताहात पाचव्या दिवशी भागवत कथेचा महासागर; राजकन्या दिदींच्या अमृतवाणीतून चरित्रकथा

■ परळी वार्ताहर

एकविसाव्या शतकातील महान संत ज्ञानेश्वर माऊली महाराज चाकरवाडीकर यांच्या 26 व्या पुण्यतिथीनिमित्त मोंढा मार्केट संकट मोचन हनुमान मंदिर, परळी येथे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाच्या पाचव्या दिवशी आज भागवताचार्या कु. राजकन्या दिदी तोंडे यांच्या अमृतमय वाणीतून भागवत कथेला भक्तांनी मोठ्या भक्तिभावाने श्रवण केले. आज कथेची आर्ती बलविर रामदासी मार्केट कमिटी सचिव,व वैद्यनाथ देवल कमिटीचे संचालक अनिलजी तांदळे यांच्या हस्ते आर्ती संपन्न कन्येच्या मुखातून ब्रह्मज्ञान: कन्हैयालाल अध्यात्मिक वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थिनी असलेल्या राजकन्या दिदी यांनी पाचव्या दिवसाची भागवत कथा अत्यंत रसाळ व ओघवत्या वाणीतून सादर केली. माऊली महाराज चाकरवाडीकर यांचे चरित्र व कार्य उलगडताना दिदींनी सांगितले की, "माऊलींनी आयुष्यभर अन्नदान, भक्तसेवा व नामस्मरणाचा प्रचार केला. प्रत्येक जीवात परमेश्वर पाहणे हाच माऊलींचा मुख्य उपदेश होता."

आजच्या कथेत भगवंताच्या लीला, भक्त प्रल्हादाचे चरित्र व नामस्मरणाचे महत्त्व यावर दिदींनी प्रकाश टाकला. "संतांच्या चरणी लीन झाल्याशिवाय मोक्षप्राप्ती नाही. माऊलींचे जीवन हेच त्याचे मूर्तिमंत उदाहरण आहे" असे सांगत त्यांनी भाविकांना नामस्मरणाचा संदेश दिला.

उपस्थिती व आयोजन:

सप्ताहाचे संयोजक व मार्गदर्शक अखिल भारतीय वारकरी भजनी मंडळाचे अध्यक्ष ह.भ.प. रामेश्वर महाराज कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या सप्तहाला भाविकांची मोठी गर्दी होत आहे. कन्हैयालाल वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थिनींची विशेष उपस्थिती होती.

कथेच्या शेवटी राजकन्या दिदींचा माऊलींची प्रतिमा व शाल-श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. कोकाटे महाराजांनी आलेल्या सर्व भाविक व कलावंतांचे आभार मानले.

माऊलींच्या सप्तहात पाचव्या दिवशी राजकन्या दिदींची भागवत कथा; भक्त ब्रह्मरसात न्हाले कन्येच्या मुखातून माऊलींचे चरित्र; राजकन्या दिदी तोंडे यांच्या कथेने भारावले वातावरण 26 व्या पुण्यतिथीला भागवत कथेचा पाचवा दिवस; "नामस्मरण हेच माऊलींचे तत्त्वज्ञान" - राजकन्या दिदी यांनी कथेच्या माध्यमातून रशिकांना मंत्रमुग्ध केले दुपारी मन्मथ स्वामी महिलाभजनी मंळानी अतिशय सुंदर भजनाची सेवा केल्याबद्दल ह.भ.प.रामेश्वर महाराज कोकाटे यांच्या हस्ते माऊलींची प्रतीमा भेट देऊन सर्व महिलांचा सत्कार करण्यात आला तर भागव कथेची आरती मार्केट कमिटीचे सचिन बलविर रामदासी साहेब व वैजनाथ देवल कमिटीचे संचालक अनिलजी तांदळे यांचा पुष्पगुच्छ देऊन व माऊलींची प्रतीमा भेट देऊन सत्कार गोविंद महाराज मुंडे व रामेश्वर महाराज कोकाटे सप्ताहा संयोजक यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला.



## मानवतावादी विचारवन्त साहित्यिक कवी डॉ.म.सु.पगारे लिखित बा, तथागता! या विशाल काव्याचे मूळ मराठी भाषेसह,इंग्रजी, हिंदी व अहिराणी या तीन भाषेतील अनुवादाचे मनभावन एफ.एम.आकाशवाणी येथून १ जुलै२०२६पासून क्रमश : वाचन

■ जळगाव : वृत्तसंस्था

महाराष्ट्रातील नामवंत साहित्यिक समीक्षक,विचारवन्त,संशोधक,कवी तथा कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथील भाषा प्रशाळा संशोधन विभागाचे प्रमुख तसेच विद्यापीठ व्यवस्थापन समितीचे माजी सदस्य प्रोफेसर डॉ.म.सु.पगारे यांनी मानवतावादातून मांडलेला बुद्ध विचार तब्बल अडीचशे पृष्ठांनी काव्यरूपातून साकारला असून या कवितेची तीन आविष्काराणामध्ये कवींनी विभागणी केलीय.पहिल्या आविष्काराणात कवीने मानवाशी संवाद साधलाय. तर दुसऱ्या आविष्काराणात थेट भगवान बुद्धांशी सवांद साधलेला आढळतो.तिसऱ्या आविष्करणात मात्र कवी स्वतःशी संवाद साधतांना दिसतो. या विशाल कवितेला मिळालेला जनाधार लक्षात घेता दैनिक सकाळ माध्यमाने बा, तथागता! या विशाल कवितेची दुसरी आवृत्ती एका वर्षाच्या आत प्रकाशित केली.

वाचक,समीक्षक, संशोधक यांचा लाभलेला प्रचंड प्रतिसाद लक्षात घेता या मराठी आवृत्तीचे डॉ. सी.यू. कुलकर्णी यांनी इंग्रजी अनुवाद,डॉ. भालेराव यांनी हिंदी अनुवाद व प्रा.वा. ना.आंधळे यांनी अहिराणी भाषेत अनुवाद अशा तीन भाषेत अनुवादित झालेल्या साहित्यकृतींवर पंचेचाळीस समीक्षकांनी समीक्षा लेखन केलेय. वर्षभरात बा, तथागता! या साहित्यकृतीवर आठ पुस्तके प्रकाशित होण्याचा सन्मान मिळवणाऱ्या या विशाल कवितेचे जळगाव येथील एफ.एम.मनभावन आकाशवाणी येथून १ जुलै २०२६ पासून वाजता मराठी,इंग्रजी,हिंदी व अहिराणी या चारही भाषेमधून क्रमशः वाचन प्रसारित होत आहे. बा, तथागता! या विशाल काव्य ग्रंथाचे सर्वत्र स्वागत होत आहे.

# खुनाचा प्रयत्न केल्याच्या गुन्ह्यातील आरोपी राहुल टाक यांना न्यायालयाकडून जामीन मंजूर

■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

सिरसाळा पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या खुनाचा प्रयत्न केल्याच्या (जीवे मारण्याचा प्रयत्न) गुन्ह्यातील आरोपी राहुल अरुणराव टाक यांना न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. आरोपीच्या वतीने प्रसिद्ध विधीज्ञ ॲड. एस. के. घाडगे यांनी न्यायालयात युक्तिवाद केला.

मिळालेल्या माहितीनुसार, सिरसाळा पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद क्रमांक १६५/२०२६ अन्वये राहुल टाक यांच्यावर जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप ठेवून त्यांना अटक करण्यात आली होती. या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान बचाव पक्षाचे वकील ॲड. एस. के. घाडगे यांनी न्यायालयासमोर अनेक महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले.



### वकिलांचा युक्तिवाद आणि विलंबाचा मुद्दा

सुनावणीदरम्यान बचाव पक्षाने न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की, फिर्यादी आणि आरोपी यांच्यात जुना जमीन व शेती संदर्भातील वाद सुरू आहे. याच वादातून आणि गैरसमजातून फिर्यादीने राहुल टाक यांचे नाव या गुन्ह्यात गोवले आहे.

तसेच, कथित घटना ही ४ जून २०२६ रोजी घडल्याचे म्हटले आहे, मात्र याप्रकरणी तब्बल ५ दिवसांनंतर म्हणजेच ९ जून २०२६ रोजी एफआयआर (FIR) दाखल करण्यात आला. फिर्याद नोंदवण्यास झालेल्या या विलंबाबाबत ॲड. घाडगे यांनी न्यायालयात आक्षेप घेतला.

आरोपी राहुल टाक यांचा या कथित घटनेशी कोणताही थेट संबंध नाही. त्यांच्याकडून कोणतीही रिकव्हरी करणे बाकी नसून, तपासासाठी आता पोलीस कोठडीची अजिबात आवश्यकता नाही, असा युक्तिवाद न्यायालयात करण्यात आला. तसेच आरोपी हे परळी वैजनाथ येथील कायमस्वरूपी रहिवासी असून पोलिसांना तपासात पूर्ण सहकार्य करण्यास तयार असल्याचेही कोर्टाला सांगण्यात आले.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि बचाव पक्षाचे मुद्दे ग्राह्य धरून माननीय न्यायालयाने आरोपी राहुल अरुणराव टाक यांना जामीन मंजूर केला आहे.

# "मुलगी-मुलगा एकसमान माना, मुलींना सुसंस्कारीत बनवा" परळीत ह.भ.प. खुशीताई भोसले व अक्षताताई गायकवाड यांचे जुगलबंदी किर्तन





■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

एकविसाव्या शतकातील महान संत ज्ञानेश्वर माऊली महाराज चाकरवाडीकर यांच्या २६ व्या पुण्यतिथीनिमित्त परळी येथील मोंढा मार्केटमधील संकट मोचन हनुमान मंदिरात भव्य पुण्यतिथी सोहळा व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. अखिल भारतीय वारकरी भजनी मंडळ व विविध व्यापारी बांधवांच्या वतीने आयोजित या सप्ताहाच्या पाचव्या दिवशी ह.भ.प. खुशीताई भोसले आणि ह.भ.प. अक्षताताई गायकवाड यांच्या जुगलबंदी किर्तनाचा रंग भरला. या किर्तनातून दोन्ही स्त्री-किर्तनकारांनी उपस्थित भाविकांना स्त्री-पुरुष समानतेचा मोलाचा संदेश दिला. संत तुकाराम महाराजांच्या अभंगातून प्रबोधन जुगलबंदी किर्तनासाठी जगद्गुरु संत तुकाराम महाराजांचा खालील प्रसिद्ध अभंग घेण्यात आला होता.

### "आपुलीया हिता जो असे जागता। धन्य माता पिता तयाचिया"

या अभंगावर अत्यंत सोप्या आणि प्रभावी भाषेत निरूपण करताना दोन्ही किर्तनकारांनी मानवी जीवनातील आई-वडिलांचे सर्वोच्च स्थान आणि मुला-मुलींच्या संस्कारांचे महत्त्व पटवून दिले. आपल्या स्वतःच्या कल्याणासाठी आणि पारमार्थिक हितासाठी जो सदैव जागृत असतो, अशा सुपुत्राला जन्म देणारे माता-पिता खरोखरच धन्य असतात, असा भावार्थ त्यांनी ओघवत्या शैलीत उलगडून दाखवला.

### मुलगी मुलासारखीच सक्षम; स्त्री-पुरुष समानतेचा संदेश -

"आजच्या काळात मुलगी कोणत्याही क्षेत्रात मुलापेक्षा कमी नाही. ती प्रत्येक बाबतीत सक्षम आहे," असे सांगत खुशीताई भोसले व अक्षताताई गायकवाड यांनी पालकांना आवाहन केले की, मुलगा आणि मुलगी असा भेद न करता दोघांनाही एकसमान माना आणि मुलींना उच्च विचार व सुसंस्कारीत बनवा. संत ज्ञानेश्वर माऊली महाराज चाकरवाडीकर यांनीही आपल्या हयातीत स्त्री-पुरुष समानतेला नेहमीच अग्रक्रम दिला, आठवण त्यांनी यावेळी करून दिली. या जुगलबंदी किर्तनाने संपूर्ण परिसरात भक्तिमय आणि प्रबोधनात्मक वातावरण निर्माण झाले होते.

### मान्यवरांच्या हस्ते किर्तनकारांचा सत्कार-

किर्तनाची सांगता झाल्यानंतर दोन्ही विदुषी किर्तनकारांचा जाहीर सत्कार करण्यात आला. हा सत्कार अखिल भारतीय वारकरी भजनी मंडळाच्या जिल्हाध्यक्षा सौ. शोभाताई भास्करराव चाटे, शहराध्यक्षा सौ. सुरेखाताई विजयकुमार मेनकुदळे, तालुकाध्यक्षा अनिताताई पांडे (देशमुख), मंगलताई देशमाने तसेच सप्ताहाचे मुख्य संयोजक ह.भ.प. रामेश्वर महाराज कोकाटे यांच्या हस्ते पुष्पहार घालून करण्यात आला. याप्रसंगी बोलताना सौ. सुरेखाताई मेनकुदळे यांनी दोन्ही महाराजांच्या उत्कृष्ट प्रबोधनाचे कौतुक केले व त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाला परळी शहर व परिसरातील महिला भाविकांची आणि वारकरी संप्रदायातील नागरिकांची मोठी उपस्थिती होती.